# धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नमेचा अभ्यास

**प्रा. डॉ. शोभा महारू चौधरी**

*डी. ई. सो. चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे*

***सारांश:*** *प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या एकुण १४० विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पध्दतीने न्यादर्श म्हणून निवड केली. संशोधनकार्य करण्यासाठी या संशोधन अभ्यासात इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांची अभ्यासमग्नता मोजण्यासाठी डॉ. आशा भटनागर यांनी तयार केलेल्या अभ्यासमग्नता शोधिकेचा वापर करण्यात आला. माहिती संकलनासाठी केला आहे. प्रस्तुत संशोधन धुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नेचे समान आहेत.*

**प्रस्तावना:** बऱ्याचदा पालकांकडून अशी तक्रार ऐकायला मिळते की, मुले अभ्यासात एकाग्र होत नाहीत. बऱ्याच वेळा टी.व्ही. समोर बसूनच होमवर्क पूर्ण करतात गाणे ऐकत असतात, अभ्यास करतांना कुणाचा फोन आला तर सारखे बोलत असतात. अभ्यासाची जागा बदलतात घरातच अशा ठिकाणी बसतात की जेथे घरच्यांची ये—जा मोठया प्रमाणात सुरू असते. अभ्यास करताना एखाद्या वस्तूचा शोध घेणे. पुस्तक वाचताना जवळून कोणी गेल्यास त्याच्याकडे लक्ष केंद्रीत करणे. यासारख्या तक्रारी सारख्या पालकांकडून ऐकायला येतात. मात्र काही वेळा मुलांच्या हया तक्रारी असतात की घरात अभ्यासासाठी स्वतंत्र खोली नाही. एकत्र कुटुंबामध्ये गर्दी जास्त, लहान भावंडे यांचा दंगा, खेळणे यामुळे ही ते अभ्यासात एकाग्र होत नाहीत.घरातील सदस्यांमध्ये वारंवार उडणारे खटके, त्यांच्यातील टोकाचे मतभेद, त्याचे भांडणात रूपांतर,व्यसनाधीन पालक इ. गोष्टींमुळे मुलांना अभ्यासासाठी पोषक वातावरण उपलब्ध होत नाही. काही वेळा मुलांना शाळेकडून, शिक्षकांकडून पुरेसे प्रोत्साहन मिळत नसेल तर अशा वेळी देख्शील मुले अभ्यासात एकाग्र होत नाहीत. पालकांची शिक्षणाबद्दलची अनास्था पालकांचे अज्ञज्ञन यामुळे देखील मुलांना शिक्षणाची गोडी वाटत नाही. ते शाळेत नियमित जात नाहीत तसेच वेळेवर अभ्यास देखील पूर्ण करीत नाहीत. अभ्यासात मग्न होण्यासाठी पुरक वातावरण नसल्यामुळे अशी मुले मागे पडतात. प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेचा शोध घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाची गरज:** विद्यार्थ्यांची प्रगती कितपत झाली आहे. त्यांच्या काही समस्या आहेत का? पालकांच्या शाळेकडून व शिक्षकांच्या पालकांकडून काही अपेक्षा आहेत का? या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी शिक्षक—पालक संघाची निर्मिती झाली. प्रत्येक शाळेत महिन्यातून किमान एकदा तरी पालकांना सभेसाठी बोलावले जाते. आणि मग पालक व शिक्षक यांच्या विद्यार्थ्यांबाबतच्या अनेक तक्रारी ऐकायला मिळतात. त्यावर उपाय ही सुचविले जातात. सगळयात महत्वाच प्रश्न म्हणजे

विद्यार्थी नापास का होतात? त्यांनी कमी गुण का मिळविले? या प्रश्नांच्या मागील कारणांचा शोध घेतला जातो. त्यातून एक गोष्ट जाणवते की मुले नियमित अभ्यास करत नाहीत. त्यामुळे अभ्यास होत नाहीत. थोडक्यात मुले अभ्यासात मग्न होत नाहीत. अभ्यासात मग्न होणे किंवा एकाग्र होणे याबाबत मुले व मुली यांच्यात फरक आढळतो का? कारण बऱ्याच परीक्षांमध्ये मुली या मुलांपेक्षा सरस ठरलेल्या आहेत. म्हणून मुलींची अभ्यासत मग्न होण्याची क्षमता मुलांपेक्षा जास्त आहे का? याचा ही शोध प्रस्तुत अभ्यासात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. अभ्यासासाठी पोषक वातावरण नसेल तर अभ्यास कमी असतो का? ग्रामीण भागात शिक्षणासाठी पुरेशा सुविधा नसतात परंतु शहरात मात्र शिक्षणासाठी अनेक संधी उपलब्ध असतात. अभ्यासासाठी पोषक वातावरण असते. म्हणजेच ग्रामणी व शहरी भागातील विद्यार्थी यांचा अभ्यासत मग्नतेत फरक आढळतो का? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर शोधण्यासाठीच प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

**उद्दिष्टे:—**

१. धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेचा वितरणाचा शोध घेणे.

२. धुळे तालुक्यातील मुलांच्या व मुलींच्या अभ्यासमग्नतेची तुलना करणे.

३. धुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेची तुलना करणे.

**परिकल्पना:—**

१. इयत्ता ९ वी तील मुले व मुली यांच्या अभ्यासमग्नतेत सार्थक फरक नसतो.

२. ग्रामीण भागातील व शहरी भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये सार्थक फरक नसतो.

**न्यादर्श:—** या अभ्यासासाठी धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या ४० विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पध्दतीने न्यादर्श म्हणून निवड केली.

**संशोधनाची साधने:—**

या संशोधनात अभ्यासात इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांची अभ्यासमग्नता मोजण्यासाइी डॉ. आशा भटनागर यांनी तयार केलेल्या अभ्यासमग्नता शोधिकेचा वापर करण्यात आला. या चाचणीत एकूण ४० विधाने असून ३८ विधाने होकारार्थी व २ विधाने नकारार्थी आहे. प्रत्येक विधानाला होय, नाही व अनिश्चित असे तीन पर्याय आहेत. चाचणीचा विश्वसनीयता गुणांक ०.८७ असून आशय व रचनात्मक सहप्रमाणता मानसशास्त्राच्या ३३ तज्ञांनी स्पष्ट केली आहे. ही चाचणी मुळ हिंदी व इंग्रजी भाषेत असून संशोधिकेने तिचे मराठीत भाषांतर केलेले आहे. या संशोधन अभ्यासात शोधिकेच्या मॅन्युअल प्रमाणे शहरी—ग्रामीण, मुले—मुली असा गट करून अभ्यास करण्यात आला आहे.

**संख्याशास्त्रीय परिमाणे:—** प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान t काढण्यात आला.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:—** प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासामग्नतेचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी व उद्दिष्टांनुसार संशोधनात मांडण्यात आलेल्या परिकल्पना तपासून पाहिल्यात.

**उद्दिष्टे :—**

**१. धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेच्या वितरणाचा शोध घेणे.**

धुळे तालुक्यातील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेच्या वितरण

| इ. ९ वी | संख्या | मध्यमान | मध्यगा | प्रमाण विचलन | शिखरदोष | विषमितता |
|---|---|---|---|---|---|---|
| अभ्यासमग्नतेच्या वितरण | १४० | ६२.०७ | ६३.८५ | ५.७६ | ०.२५० | ०.४२ |

**अर्थनिर्वचन:—** वरील कोष्टक १ वरून मध्यगाचे मूल्य मध्यमानपेक्षा जास्त असल्याने गुणाचा वक्र ऋण विषमित आहे. तर वितरणातील शिखरदोष मूल्य ०.२५० असून ते ०.२६३ पेक्षा कमी असल्याने वक्र उच्चशिखरी आढळून आला.

**उद्दिष्टे :—**

**२. धुळे तालुक्यातील मुलांच्या व मुलींच्या अभ्यासमग्नतेची तुलना करणे.**

परिकल्पना क्र. १

इयत्ता ९ वी तील मुले व मुली यांच्या अभ्यासमग्नतेच्या मध्यमान गुणांकता सार्थक फरक आढळून येत नाही.

धुळे तालुक्यातील मुलांच्या व मुलींच्या अभ्यासमग्नतेचे

मध्यमान (M), प्रमाण विचलन (SD) व t मुल्य

| प्राथमिक शाळेतील | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना t मूल्य | t मूल्य (प्राप्त) | त्याग / स्विकार |
|---|---|---|---|---|---|---|
| मुले | ६९ | ६२.४९ | ४.८१ | १.९७ | १.१७ | स्विकार |
| मुली | ७१ | ६३.५ | ५.३५ | | | |

**अर्थनिर्वचन:—** df= १३८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९७ आहे व प्राप्त t मूल्य .१.१७ असून ते नमुना t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, धुळे तालुक्यातील मुलांच्या व मुलींच्या अभ्यासमग्नतेचे मध्मान गुणांकात सार्थक फरक दिसून येत नाही. मध्यमानातील आलेला फरक हा योगायोगाने आला आहे अस म्हणावे लागेल. यावरून असे म्हणता येईल, धुळे तालुक्यातील मुलांच्या व मुलींच्या अभ्यासमग्नतेचे समान आहेत.

**उद्दिष्टे :—**

**३. धुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

परिकल्पना क्र. २

ग्रामीण भागातील व शहरी भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये सार्थक फरक नसतो.

ग्रामीण भागातील व शहरी भागातील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेचे मध्यमान (M), प्रमाण विचलन (SD) व t मुल्य

| प्राथमिक शाळेतील | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना t मूल्य (०.५) | t मूल्य (प्राप्त) | त्याग / स्विकार |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ७० | ६३.०० | ५.०४ | १.९७ | ०.१८ | स्विकार |
| शहरी | ७० | ६३.१५ | ५.०४ | | | |

**अर्थनिर्वचन:—** df= १३८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९७ आहे व प्राप्त t मूल्य ०.१८ असून ते नमुना t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, धुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेचे मध्ममान गुणांकात सार्थक फरक दिसून येत नाही. मध्यमानातील आलेला फरक हा योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे म्हणता येईल, धुळे तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेचे समान आहेत.

**निष्कर्ष:—**

१.धुळे तालुक्यातील मुलांच्या व मुलींच्या अभ्यासमग्नतेचे समान आहेत.

२.धुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासमग्नतेचे समान आहेत.

**संदर्भसूची:—**

१.पंडित ब.बि. (२००५) शिक्षणातील संशोधन, नित्यनूतन प्रकाशन पुणे.

२.मुळे रा.श., उमाठे वि.तु. (१९८७) शैक्षणिक संशोधनातील मूलतत्वे महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर

३.डॉ. वि.रा. भिंतोड २००४ शैक्षणिक संशोधन पध्दती नित्य नुतन प्रकाशन — पुणे ३०

४.भिंताडे वि.रा. (१९८९) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नुतन प्रकाशन

५.कुलकर्णी, डी.आर. (२००८) प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र (प्रथम आवृत्ती) नागपूर : विद्या प्रकाशन.

६.नागदेवते, प्र.कि. (२०१०) शैक्षणिक व मानसिक मापन (प्रथम आवृत्ती) नागपूर : विद्या प्रकाशन.